नवी मुंबई महानगरपालिका

मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| विषय क्र.०१.<br>दि. २५ ऑगस्ट २०२० | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात करारपध्दतीने (कंत्राट) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय तज्ञ यांना नव्याने नेमणूका देणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०८/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-०५/प्र.क्र. /१७२३/२०२०. |
| ठराव क्र.१३३. | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात करारपध्दतीने (कंत्राट) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय तज्ञ यांना नव्याने नेमणूका देणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे अधिकारी यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास आवश्यकता असल्याने नाक, कान, व घसा तज्ञ या संवर्गातील कार्यरत असणारे तज्ञ अधिका-यांना ठोक मानधन रुपये ७५,०००/- व दंतशल्य चिकित्सक या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांना ठोक मानधन रक्कम रुपये ६०,०००/- याप्रमाणे पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता करारपध्दतीने प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५३(१) अन्वये नव्याने नेमणूक देणेबाबत मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात करारपध्दतीने (कंत्राट) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय तज्ञ यांना नव्याने नेमणूका देणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक १३३ अन्वये अधिकारी यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास आवश्यकता असल्याने नाक, कान, व घसा तज्ञ या संवर्गातील कार्यरत असणारे तज्ञ अधिका-यांना ठोक मानधन रुपये ७५,०००/- व दंतशल्य चिकित्सक या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांना ठोक मानधन रक्कम रुपये ६०,०००/- याप्रमाणे पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता करारपध्दतीने प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५३(१) अन्वये नव्याने नेमणूक देणेबाबत मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (चित्रा बाविस्कर) | (अभिजीत बांगर) |
| नगरसचिव | आयुक्त तथा प्रशासक |
| नवी मुंबई महानगरपालिका | नवी मुंबई महानगरपालिका |